# गोष्ट एका WhatsAppची

लेखक: अमोल परब

"मम्मा, आपण आपल्या घरी कधी जाणार?
आपण जाऊया ना पप्पाकडे.....प्लिज........."

छोटी रश्मी, ऑफिसमधून नुकतीच घरी आलेल्या तिच्या मम्माच्या म्हणजेच, दिप्तीच्या पाठी भुणभुण करत, तिच्या मागेमागे फिरत होती.

"तुला किती वेळा सांगितलंय की, तुझ्या पप्पाचा विषय, आता ह्या घरात काढायचा नाही म्हणून" तिची मम्मा रश्मीवर खेकसत म्हणाली.

"आता पुन्हा कधी बोललीस ना, तर एक कानाखाली देईन."

मम्माचा हा असा अवतार पाहून, रश्मी रडायलाच लागली. बाहेर हा कसला गोंधळ चाललाय हे पहायला एव्हाना तिची आजीदेखील बाहेर आली होती.

"रोज आल्या आल्या कशाला गं ओरडतेस तिच्यावर?" छोट्या रश्मीला आपल्या जवळ घेत, आई दिप्तीवर वैतागली.

"तिला काही कळतंय थोडंच. एकतर एकटीच असते पोर. तू ही स्वतःला कामात इतकं बुडवून घेतलंयस की, हल्ली बोलायला देखील महाग झाली आहेस तू. कधी असतेस का घरी? मग पोर करणार तरी काय?"

आजी सहा वर्षाच्या रश्मीला, स्वतःच्या मांडीवर थोपटत तिचं सांत्वन करत तिच्या मम्माला बोलत होती.

"हो, मीच मेली वाईट. तिच्यासाठीच करतेय ना हे सगळं? मला काय हौस आहे दिवसभर बाहेर हुंदडायची?" दिप्तीचाही आवाज आता चढला होता.

"तिकडे ते, आणि इकडे ही. सारखं नुसतं पप्पा पप्पा!!!!!
मम्मा नकोच आहे कुणाला. तो वकील पण सारखा आपली बाजू तगडी आहे, आपल्याला काळजीचं काहीच कारण नाही, हेच गेले सहा महिने बोलतोय. सगळे एकजात माझ्याच राशीला कसे आले आहेत देवजाणे?" दिप्ती आता स्वतःवरच वैतागत होती.

"थोडं त्यांच्या कलेने घेतलं असतंस तर?....."

उत्तरादाखल दिप्तीने दिलेला जळजळीत कटाक्ष पाहून, तिची आई पुढे काही बोललीच नाही.

"म्हणजे??? म्हणायचय काय तुला?
मी हे सगळं मुद्दाम करतेय का? तुम्ही सगळेच माझ्या विरोधात बोला. मी एकटी राबतेय त्याची कुणाला काही पडलेलीच नाहीये.
जा.....सगळेच जण मला सोडून जा...कुणी नको मला."

एव्हढं बोलून दिप्ती तणतणत आत निघून गेली.

"आजी, मम्मा अशी का वागते? पप्पाबद्दल बोललं की एव्हढी का मला ओरडते नेहमी?,मला पप्पाची खूप आठवण येते गं....." रश्मी अजूनही आजीच्या कुशीत मुसमुसत होती.

आत्ताच्या प्रसंगावर नक्की कुणाची समजूत घालावी, हे त्या म्हातारीला समजतचं नव्हतं.

नातीची,
मुलीची,
की आपली स्वतःची?....

Amol Parab

"जाऊ दे ग बाळा. तू नको लक्ष देऊस. होईल सगळं ठीक. तू छान मुलगी आहेस की नाही? मग देवबाप्पा सगळं तुझ्या मनासारखं करेल." आजी रश्मीच्या डोक्यावरून आपला थरथरता हात फिरवत म्हणाली.

"खरंच?????" त्या इवल्याश्या डोळ्यात, आजीच्या या बोलण्याने फुलपाखरं नाचू लागली.

"हो" उत्तरादाखल तो सुरुकुतला चेहरा तिच्यासारखाच गोड हसला.

"येssssssss" रश्मी आनंदाने, हवेत हात उंचावून मोठ्याने ओरडली, पण पुढच्याच क्षणाला मम्मा आतल्या रूममध्ये आहे हे जाणवून लगेच शांत झाली.

पोरगी मूळपदावर आलेली पाहून आजी देखील सुखावली.

देव आता ह्या वयात अजून काय काय पहायला लावणार आहे? हीच काळजी त्या म्हातारीच्या जीवाचं पाणी पाणी करत होती. सध्यातरी ही परिस्थिती लवकर सुधारू दे! असं मनातल्या मनात त्या विनायकाला साकडं घालत ती आता आतल्या खोलीत निघाली.

************************************

रात्री जेवल्यावर, प्रत्येकजण निजायची तयारी करत होता.

"आजी, आज पण, मी तुझ्याजवळ झोपू?" रश्मी आजीला चिकटत तिला म्हणाली.

"झोप नं बाळा.....गोष्ट सांगू का?" आजीने रश्मीला कुशीत घेत तिला विचारलं.

"नको..." रश्मी तिला म्हणाली आणि लगेचच तिने आजीचा मोबाईल आपल्या ताब्यात घेतला.

आजीला रश्मीचा कावा लक्षात आला. 'हल्लीची मुलं, भारीच हुशार की बाई' असं स्वतःशीच बोलत तिने रश्मीला हसून संमती दिली.

"माऊ, चल झोपायला. आजीला त्रास देऊ नकोस" बाहेरून मम्मा रश्मीला झोपायला बोलावत होती.

"झोपू दे गं, आज तिला माझ्यापाशी???" आजी दिप्तीला म्हणाली. आजीने आपली बाजू घेतलेली बघता, रश्मी हातातला मोबाईल मम्मा पासून लपवत आजीच्या कुशीत शिरली.

"ठीक आहे. पण लवकर झोप आणि मोबाईलवर जास्त वेळ नाही पाहायचंय कार्टून. हल्ली बराच मोबाईल मोबाईल करायला लागली आहेस. कळलं का?"

एव्हढं बोलून दिप्ती निघून गेली. ह्यावर आजीने रश्मीला लाडाने एक टपली मारली आणि तिच्या हातात पुन्हा आपला मोबाईल दिला. रश्मी त्यावर youtube चालू करून कार्टून बघायला लागली.

दिवसभराची दमलेली आजी, बघता बघता कधी झोपली तिचं तिलाच कळलं नाही.

आजीला झोपलेली पाहून रश्मीने लगेचच कार्टून बंद करत, whatsapp चालू केला.

Hello pappu
Mi Rashmi

समोरून काहीच रिप्लाय आला नाही.

Pappu
😊

Amol Parab

मेसेज पाठवून बराच वेळ झाला तरी, अजून पप्पाचा काहीच रिप्लाय आला नाही हे पाहून रश्मी हिरमुसली. हल्ली गेल्या चार पाच दिवसापासून, ती दररात्री आजीच्या मोबाईलवरून, तिच्या पप्पाला याच वेळेला मेसेज करायची. फार आठवून आठवून, तिने हा नंबर आजीच्या मोबाईलमध्ये सेव्ह केला होता. ते देखील तिच्या मम्मापासून लपवून आणि आता तिला तिचा पप्पा वाट बघायला लावत होता.

तिला खरंतर खूप झोप येत होती, पण आज तिला तिच्या पप्पाशी बोलायचंच होतं. तिला आठवत होतं, जेव्हा तिने पहिल्यांदाच त्याला मेसेज केला होता, तेव्हा तर तिच्या पप्पांनी तिला ओळखलंच नव्हतं. आजीच्या नंबरवरून ती बोलतेय हे त्याला कळलंच नव्हतं.

मग ओळखलं त्याने.

फार मज्जा आलेली तेव्हा.....तिला.

मग ती दररात्री आजीच्या मोबाईल वरून त्याच्याशी बोलायची मम्माच्या नकळत.
मम्मा जेव्हढी रागावते, तेव्हढा आपला पप्पा वाईट नाहीये हे माहित होतं तिला. पण हल्ली तिची मम्मा त्याच्याशी फार वेगळं वागायची आणि तिच्याशीपण.

सारखी तिला रागवायची, ओरडायची, एकटीच रडायची आणि म्हणूनच रश्मीला आता तिच्या पप्पाला भेटायचंच होतं.

पण त्यासाठी पप्पाने मेसेज करायला हवा ना.

इतक्यात फोनची मेसेज रिंग वाजली.

पप्पाचा मेसेज आला होता.

(पप्पा)
Hi beta
How are you?
😊

(रश्मी)
I hate you
😥

(पप्पा)
Ka g
Kay zal

(रश्मी)
Mamma oradali

(पप्पा)
Ka?😲

(रश्मी)
Mala tuzyakade yaychay

(पप्पा)
Ohhh

Amol Parab

(रश्मी)
Tu ye na
Please

(पप्पा)
Ok
Mi yeto udya......

(रश्मी)
Khar

(पप्पा)
Yes I promise

(रश्मी)
I love you Pappa 😘

(रश्मी)
👺

(पप्पा)
🙈

(रश्मी)
🍗

(पप्पा)
🍢

नंतर बराच वेळ पप्पा आणि रश्मी whatsapp वर गप्पा मारत होते.

(पप्पा)
Chala zopa Udya school la jaychay na

(रश्मी)
Ok Pappa
Bye Good night

(पप्पा)
Good night

(रश्मी)
Bye 😘 Udya ye

(पप्पा)
Nakki yein Chal zop aata
रश्मीने हळूच आजीचा मोबाईल बंद केला आणि खुशीत आजीच्या अंगावर हात टाकून झोपून गेली. उद्या तिचा पप्पा तिला भेटायला येणार होता. फक्त तिला तिच्या मम्माची काळजी होती. ती आपल्यासोबत पप्पाला पण ओरडायला नको.

Amol Parab

रश्मी सकाळी उठली. आज पटापट शाळेसाठी तयार झाली. नेहमीसारखी तिने अजिबात चिडचिड केली नाही. तिच्या या वागण्याचं दिप्तीसोबत तिच्या आजीलाही नवल वाटत होतं.

सगळं आवरेपर्यंत नाही म्हटलं तरी १० वाजलेच. आज पुन्हा बॉसची बोलणी बसणार, असा मनाशी विचार करत दिप्ती ऑफिसला निघणार, इतक्यात......

पाठीमागून आईने तिला हाक मारली.

"का अशी वागतेस तिच्याशी?"

आईच्या या प्रश्नासोबत दिप्ती दारात अडली.

"मला उशीर होतोय" ती आईचं बोलणं टाळत निघतचं होती की,

"जास्त उशीर होण्याआधी, समजून घे तिला. सध्या तुझ्या इतर गोष्टींपेक्षा, रश्मी फार जास्त महत्त्वाची आहे." आईच्या आत्ताच्या आवाजात जरब होती.

दिप्ती काही न बोलता, दाराबाजूच्या कोचावर मटकन खाली बसली. तिला देखील रश्मीशी तिचं स्वतःचं वागणं कुठेतरी खटकत होतंच.

"अगं, लहान आहे ती. तिला नाही समजत तुमच्या मोठ्यांच्या गोष्टी. ती तिच्या मैत्रिणींतमध्ये स्वतःला पहातेय. त्यांना आई आणि बाबा दोन्ही असतात. पण रश्मीकडे दोन्ही नाहीयेत."

"का? मी आहे ना तिची आई. बाकी कुणी नसलं तरी." दिप्ती रडत रडत आईला म्हणाली.

"मलाही नाही वागायचं तिच्याशी असं. पण मी काय करू तूच सांग? सगळीकडून अडकलेय मी. भूतकाळ विसरण्यासाठी, भविष्याची तरतूद नको का करायला? आणि मी माझा हक्क नाही सोडणार. मी बायको आहे त्याची.....रखेल नाही. बरोबर दाखवेन एकेकाला. त्या लोकांना तर मी सहजासहजी नाही सोडणार."

"....." लेकीच्या ह्या उत्तरावर ती म्हातारी पण गप्प बसली.

एक-दोन क्षण कुणीच कुणाशी बोललं नाही. पुढच्याच क्षणाला दिप्ती उठली आणि ऑफिसला जायला निघाली, तेव्हढ्यातच दाराची बेल वाजली.

तिने दार उघडलं.

"रश्मी इथेच राहते का?"

दारात पोलीसांना पाहून आईने घाबरून दिप्तीकडे पाहिलं..

"का काय झालं??" दिप्तीने घाबरत पोलिसांना विचारलं.

"काही नाही, तिचा छोटासा अपघात झालाय. तुम्हाला आमच्यासोबत सिटी हॉस्पिटलला यावं लागेल" पोलिसांनी असं सांगताच दोघीजणी बावरल्या.

दिप्ती आणि आजी तडक पोलिसांसोबत सिटी हॉस्पिटलला निघाल्या.

Amol Parab

"तिला गुंगीचं औषध दिलंय. फारच घाबरली होती बिचारी. पण, काळजी करण्याचं कारण नाही. छोटीशी खोक पडली आहे. तीन-चार टाके पडले आहेत. She will be fine in a week" एव्हढं बोलून डॉक्टर निघून गेले.

बेडवर शांतपणे पहुडलेल्या, रश्मीकडे पहात आजी देवाचा जप करत होती.

"पण हे सगळं झालं कसं?" दिप्तीने बाजूला उभ्या असलेल्या पोलिसांना विचारलं.

"तुमची मुलगी शाळेच्या गेटवरून अचानक पप्पा पप्पा करत रस्त्यावर धावत आली आणि समोरून येणाऱ्या गाडीला धडकली. गाडीवाल्याची काही चूक नव्हती. इतक्या पटकन झालं की त्याला सावरण्याची संधीच मिळाली नाही."

एव्हढं बोलून बाजूच्या बाकड्यावर रश्मीकडे एकटक बघणाऱ्या इसमाकडे हात दाखवत पोलीस म्हणाले.

"खरंतर 'हे' होते म्हणून रश्मी वेळेवर इथे पोहचू शकली. ह्यांनीच तिला इथे ऍडमिट केलं."

दिप्तीने त्या माणसाकडे पाहिलं. तो एक तिच्याच वयाचा सर्वसाधारणसा तरुण होता. ती लगेचच त्याच्याकडे गेली.

"Thanks!!! मी आपले आभार कसे मानू. मला कळतंच नाही."

"No, it's ok" तो तरुण अडखळत तिला म्हणाला.

दिप्ती त्याचे आभार मानून पुन्हा रश्मीकडे जातंच होती की....

"एक विचारू?" त्या तरुणाने दिप्तीला विचारलं.

त्यासरशी दिप्ती पुन्हा मागे वळली.

"तुमचं आणि तुमच्या मिस्टरांमध्ये काही प्रॉब्लेम सुरू आहे का?"

त्याच्या ह्या प्रश्नासरशी दिप्तीने चमकून त्याच्याकडे पाहिलं.

"सॉरी, मला माहिती आहे की, हा तुमचा पर्सनल प्रॉब्लेम आहे. पण रश्मीला इथे आणताना ती सारखी पप्पा, पप्पा असं करत होती. प्लिज जे काही असेल ते लवकर सॉर्ट आऊट करून घ्या. मुलगी फार गोड आहे हो तुमची.
लाईफ प्रत्येकाला पुन्हा संधी देतेच असं काही नाही.....मला असं वाटतं की....."

"Her father is no more" त्या तरुणाचं वाक्य अर्धवट तोडत दिप्ती त्याला म्हणाली.

"Ohh no....." दिप्तीकडून हे ऐकताच तो तरुण गडबडला.

"सहा महिन्यांपूर्वीच सगळं चांगलं सुरू असताना अचानक छातीत एक कळ आली आणि संपलं सगळं. त्याचं असं जाणं मीच अजून स्वीकारलं नाहीये, तर रश्मीची गोष्टचं वेगळी आहे. ती तिच्या पप्पाच्या खूप जवळ होती."
बोलता बोलता दिप्तीच्या डोळ्यात पाणी साचलं.

"तरीच" तो तरुण स्वतःशीच विचार करत म्हणाला.....

"तरीच काय?" दिप्तीने चमकून त्याला विचारलं.

उत्तरादाखल त्याने स्वतःचा मोबाईल तिला दाखवला.

Amol Parab

"हा नंबर कुणाचा आहे?"
त्याने त्याच्या मोबाईलमधला रश्मीच्या नावावर सेव्ह केलेला नंबर दाखवला.

तो नंबर वाचून दिप्ती गोंधळली.
"हा माझ्या आईचा नंबर आहे, पण तो तुमच्याकडे कसा आला?"

"ह्या नंबरवरून दररात्री तुमची रश्मी माझ्याशी, तिचा पप्पा म्हणून बोलायची."

"Impossible!!!" दिप्तीने अविश्वासाने त्याच्याकडे पाहिलं.

त्याने तिच्या डोळ्यातले सगळे प्रश्न वाचले. त्याने ताबडतोब आपला WhatsApp उघडून त्याने तिला त्याच्यातले आणि रश्मीतले conversation वाचायला दिले. ते वाचताना दिप्तीला स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता.

रश्मीला
तिच्या पप्पाची येणारी आठवण,
तिच्या पप्पाची वाटणारी काळजी,
पप्पाला न भेटता येण्याबद्दलचा राग,
कालचं मम्माचं तिला ओरडण
आणि
त्याबद्दल तिने तिच्या पप्पाला तिला शाळेत येऊन भेटण्यासाठी केलेली विनवणी.

हे सगळं वाचून दिप्तीला खूप रडायला येत होतं.

"आणि म्हणून मी आज तिच्या शाळेत आलो होतो. तिने मला काल मेसेजमध्ये तिच्या शाळेचं नाव आणि जागा सांगितली होती. सोबत आज जर मी नाही आलो तर ती मम्माला न सांगता माझ्याकडे निघून येईल असं म्हणाली होती. म्हणून मग मी तिला भेटायला तिच्या शाळेत आलो. तुमच्या आईच्या whatsapp profile वर रश्मीचा फोटो होता. त्याच अनुषंगाने मी तिथे तिला शोधत होतो.

इतक्यात काहीतरी जोरात धडकल्याचा आवाज आला.

जवळ जाऊन पाहिलं तर ती रश्मीच होती. मग तिला तडक इकडे घेऊन आलो."

दिप्ती हे सगळं ऐकून बधिर झाली होती. तिला काय बोलावं हेच सुचत नव्हतं.

"Thanks" ती कसंबसं त्याचे आभार मानत म्हणाली. तिला आज पहिल्यांदा जाणवत होतं की ती रश्मीच्या बाबतीत किती चुकत आलीय ते.

"पण तिने तुम्हालाच मेसेज का केला?"

"मला माहीत नाही?"

दोघांमध्ये एक शांतता साचून राहिली होती.

"तुमचा नंबर काय आहे?" काहीतरी विचार करून तिने त्याला विचारलं.

त्याने आपला नंबर सांगताच, तिला सगळं समजलं. त्या तरुणाचा आणि तिच्या नवऱ्याचा नंबर जवळजवळ सारखाच होता, फक्त शेवटचा आकडा सोडून.

Amol Parab

रश्मीने तिच्या पप्पाचा नंबर पाठ करून ठेवला होता. फक्त तिने सेव्ह करताना शेवटच्या आकड्यात गडबड केली होती आणि तिच्या ह्याच गडबडीमुळे ती पप्पा समजून या तरुणाशी बोलत होती.

दिप्तीला आज रश्मीची केविलवाणी स्थिती कळली होती. आपण स्वतःचे दुःख सावरताना आजवर रश्मीकडे केव्हढं दुर्लक्ष करत होतो हे आज प्रथमच तिला जाणवत होतं. तिने पुन्हा एकदा त्याचे हात जोडून आभार मानले.

"प्लिज माझे आभार नका मानू. खरंतर आभार मी रश्मीचे मानायला हवेत."

दिप्तीला त्याच्या या बोलण्याचा अर्थ कळला नाही. तिने प्रश्नार्थक चेहऱ्याने त्याच्याकडे पाहिलं.

"चार दिवसांपूर्वी जेव्हा रश्मीचा मला पहिल्यांदा मेसेज आला तेव्हा मी पण आयुष्याला कंटाळून आत्महत्या करायला निघालो होतो. पण हिचा मेसेज आला आणि हिच्याशी बोलताना तिच्यात गुंतलो. मला जाणवलं की ही मुलगी माझ्यापेक्षाही जास्त अडचणीत आहे. एकटेपणा काय असतो हे मला चांगलंच माहिती आहे. माझ्या डोळ्यासमोर माझं कुटुंब गमावलंय मी.

हिच्यामुळे माझा एकटेपणा काही काळासाठी दूर झाला होता.

मी ह्या नंबरवर फोन केलेला एकदा, पण समोरून एक बाईने रॉंग्ननंबर सांगून कट केला.

मग मी, हिच्याशी तिचा पप्पा बनून बोलत राहिलो.

फार गोड आहे हो मुलगी...पण एकटी आहे बिचारी माझ्यासारखी."

त्याचं हे बोलणं ऐकून दिप्ती कासावीस झाली.

इतक्यात आतून आईचा आवाज दिप्तीच्या कानावर पडला. रश्मीला शुद्ध आली होती.

"तुम्हीं काळजी करू नका, काही नाही होणार मुलीला.

योग्य वेळी तिला नीट समजावून सांगा सगळं. समंजस आहे मुलगी. सगळं ठीक होईल. तोवर जरा तिच्या कलेने घ्या. तिचा पप्पा एक-दोन वर्षासाठी फॉरेनला गेलाय, म्हणून सांगा. मी देखील तिला आज हेच सांगणार होतो. त्याची खूण म्हणून तिने काल तिच्या पप्पाकडे मागितलेली बाहुली तिला देऊन, तिला ते पटवून देणार होतो.

तुम्ही पण थोडे दिवस हेच सांगा. हवंतर मी बोलेन तिच्याशी ह्याच नंबर वरून whatsapp वर तिचा पप्पा बनून.....

तेव्हढाच ह्या एक एकटा एकट्याचा, एकटेपणा काही दिवसांसाठी तरी दूर होईल. बघा पटलं तर....." इतकं बोलून त्याने रश्मीसाठी आणलेली बाहुली दिप्तीच्या हातात देऊन, तो झटक्यात तिथून निघून गेला.

डोळे पुसत जाणाऱ्या, त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे दिप्ती कितीतरी वेळ पहात उभी होती.

****************************************

"अगं इथे का उभी आहेस? आत रश्मी बोलवतेय तुला." इतका वेळ झाला दिप्ती आत आली नाही म्हणून आई तिला बोलवायला बाहेर आली होती.

"कशी आहेस बच्चा?" आत आल्या आल्या दिप्तीने रश्मीला जवळ घेतलं.

आता मम्मा आपल्याला ओरडणार म्हणून कावऱ्या बावऱ्या झालेल्या रश्मीला, मम्माने जवळ ओढून घेतलं. रश्मी फार खूष झाली. तिच्या केसांवरून हात फिरवत असताना अचानक काहीतरी आठवून दिप्ती तिला म्हणाली.

Amol Parab

"अगं, विसरलेच बघ. मघाशी तुझा पप्पा आला होता."
पप्पाचं नाव ऐकताच रश्मीचा चेहरा उजळला.

"कुठेय? मग आता कुठे गेला?" रश्मीने तिला विचारलं.

"अगं, त्याला ऑफिसच्या कामासाठी ऑस्ट्रेलियाला जावं लागतंय. तू मघाशी झोपली होतीस म्हणून मग तो तुला न उठवताच निघून गेला. त्याला उशीर होत होता ना म्हणून."

हे ऐकून रश्मी हिरमुसली.

"पण त्याने तुझ्यासाठी एक गिफ्ट दिलंय." असं बोलून दिप्तीने ती बाहुली रश्मीच्या हातात दिली.

"Ohh wow!! तुला माहिती आहे मम्मा? मी कालच त्याला ह्या बाहुलीबद्दल बोललेले आणि त्याने आणली. I love you पप्पा" असं बोलून तिने त्या बाहुलीची पापी घेतली.

दिप्तीमधला हा बदल पाहून म्हातारीला काही कळतंच नव्हतं. तिने खुणेनेच दिप्तीला हे सगळं काय चालू आहे असं विचारलं. यावर मी तुला सगळं नंतर समजावून सांगते असं दिप्तीने नजरेनेच आईला खुणावून तिला शांत राहायला सांगितलं.

"आई तुझा फोन दे...."

आईचा फोन रश्मीच्या हातात देऊन दिप्ती रश्मीला म्हणाली.
"चल पप्पाला, थँक्स बोल पटकन....."

रश्मीने खुशीत आजीचा फोन हातात घेतला आणि पप्पाच्या नंबर वर जाऊन

Thanks Pappa
Mala gift aawadal I love you 😘
Come soon Pappa

असं टाईप करून पाठवलं.

उत्तरादाखल समोरून
😊
Yes beta
Towar mamma ch aik
Mi lavakar parat yein
Ok Ratri bolu

असा रिप्लाय आला.

पप्पाचा मेसेज वाचून रश्मीने मम्माला गालावर एक किस करून तिला गच्च मिठी मारली. ती आज फार खूष होती, शेवटी तिची आजी बोलली होती तसंच झालं होतं.

एका छान मुलीचं देवबाप्पाने ऐकलं होतं. तिच्या इतर मैत्रिणींसारखंच, तिच्या मम्मा पप्पाला तिच्याजवळ आणलं होतं....अगदी तिच्या मनासारखं.

***Written By***
***Amol Parab***

Amol Parab